# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक 19/02/2023 (रविवार) सायंकाळ**

---

## दरोडा

पो.स्टे. रामटेक :— अंतर्गत ०७ कि.मी. अंतरावरील खिंडसी पुलीया येथे दिनांक १९/०२/२०२३ चे ००.०० ते ०१.०० वा. दरम्यान फिर्यादी नामे— सतिश जनार्धन इंगोले वय २४ वर्षे रा. डोरली ता. पारशिवनी यांचे ताब्यातील वाहन क्र. एम.एच.—४० बी. एल. —५०३६ नी रेती भरणेकरीता रामटेक मार्ग तुमसर कडे रात्री अंदाजे ००.०० वा. जात असता यातील ६ अज्ञात आरोपीतांनी त्याचे स्वत:चे ताब्यातील चारचाकी वाहन आडवे करून फिर्यादीचे ताब्यातील वाहनास थांबवुन फिर्यादी व त्याचे सोबत असलेला क्लिनर यास हात बुक्कीने मारहान करून त्यांचे अपहरण करून घटनास्थळापासुन अंदाजे ३० किमी अंतरावर घेवुन गेले व सदर वाहनाचे ड्रायव्हर व क्लिनर यांचे मोबाईल व नंगदी ३०,०००/—रू घेवुन ड्रायव्हर व क्लिनर यांना पो.स्टे. आधळगांव जि. भंडारा हद्दित सोडुन आरोपी हे १) टिप्पर क्र. एम.एच.—४० बी. एल.—५०३६ किंमती अंदाजे १०,०००००/—रू २) ३०,०००/—रू व ३) दोन मोबाईल किंमती अंदाजे ८,०००/—रू असा एकुण १०,३८,०००/—रूपयाचे मुद्देमालासह पसार झाले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. रामटेक येथे आरोपीतांविरुध्द कलम ३९५, ३६५, ३२३, ५०६ भादवी कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीतांचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास सपोनि/ पाण्डेय पो.स्टे रामटेक मो.क्र. ७०३०५४१००१ हे करीत आहे.

## पळवून नेणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल

पो.स्टे. कळमेश्वर : — दिनांक १६/०२/२०२३ चे सकाळी १०.०० वा. सुमारास पो.स्टे. कळमेश्वर हद्दीत यातील फिर्यादीची अल्पवयीन मुलगी वय १७ वर्ष ही न्यु इंग्लीश ज्युनियर कॉलेज मोहपा येथे १२ व्या वर्गात शिक्षण घेत असुन यातील घटना वेळी व ठिकाणी यातील फिर्यादी ही रोजमजुराच्या कामाकरीता गेली असता घरी मुलगी ही हजर होती परंतु फिर्यादी ही कामावरून सायंकाळी घरी परत आली असता मुलगी घरी दिसुन आली नाही तिचा आजुबाजुला व नातेवाईकांकडे आज पर्यत शोध घेतला असता मिळुन आली नाही तिला कोणीतरी फुस लावुन पळवुन नेले असावे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरुन पो.स्टे. कळमेश्वर येथे आरोपीविरुध्द कलम ३६३ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक नागपूरे मो. क्र. ८८८८८२१३६० हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर